ISSN 0976-0636

सर्वव्यापी,सर्वकालीन शालेय शिक्षणाच्या
गुणवत्तेसाठी बांधिलकी असलेले मासिक

मराठी / हिन्दी / English

# शिक्षण तरंग
# SHIKSHAN TARANG

**Printed by** Anagha Kishor Chavan, Published by Anagha Kishor Chavan **on behalf of (or owned by)** Anagha Kishor Chavan and **Printed** at Vaibhav Enterprises.Flat No.12, Siddhakala Sankul, Manikshaw Nagar, Kathe Galli, Dwarka,Nashik and **Published at** Insight Publication,Shop No.,Shrirang Mangal Apartment, Shrirang Nagar, Gangapur Road, Nashik - 422013.
**Editor :** Dr. Kishor Chavan.



Scanned with CamScanner

# शिक्षण तरंग

■ संपादक
प्रा.डॉ.किशोर चव्हाण,नाशिक
■ कार्यकारी संपादक
डॉ.विनय धोंडगे,सातारा
■ व्यवस्थापकीय संपादक
प्रा.अनघा चव्हाण,पुणे
■ सहसंपादक
प्रा.डॉ. विजय धामणे,पुणे
प्रा.डॉ.रविराज फुरडे,बार्शी
प्रा.गिरीश पाटील,नाशिक
प्राचार्य डॉ.विद्या वाजे,प्रवरानगर
प्रा.डॉ.माधुरी इसावे,पुणे
प्रा.संदिप मुळे,पुणे
प्रा.कुलदिपसिंह राजपूत,पुणे
प्रा.डॉ.सतीश पाटील,धुळे
सौ. माधुरी कि.चव्हाण,नाशिक
■ संपादकीय सदस्य
प्रा.डॉ.अंशु माथूर,भोपाळ (म.प्र.)
डॉ.विष्णू शिखरे,बार्शी
प्रा.डॉ.गणेश मुढेगावकर,सोलापूर
प्रा.डॉ.बी.एम.पाटील,उस्मानाबाद
प्रा.डॉ.सर्जेराव चव्हाण,रत्नागिरी
प्रा.बाळासाहेब दिघे,पुणे
■ तज्ज्ञ सल्लागार
प्रा.डॉ.व.झा.साळी,पुणे
मुख्या. श्री.दत्तात्रय गेणुजी काळे,
कोकणगाव (संगमनेर)
प्रा.डॉ.सुभाष भालेराव,नाशिक
प्रा.डॉ.शोभना जोशी-शेटकर,औरंगाबाद
प्रा.डॉ.सदावर्ते, नांदेड
प्रा.डॉ.देवेंद्र जोशी,नांदेड
प्रा.डॉ.आर.पी.भामरे,नाशिक
प्रा.डॉ.दिगंबर दुरगाडे,पुणे
मुख्या.राजेश गोळे,रायगड
■ मुखपृष्ठ,अंतर्गत सजावट,तंत्रसहाय्य
प्रा.नितीन कोठावदे


## अनुक्रमणिका


• **आमराईतली भुतं** ०५
प्रा.डॉ.रविराज फुरडे

• **जीवनापेक्षा गरजेचा नाही मोबाईल...** ०८
रमेश महाले

• **एक अधुरी कहाणी** १०
दयानंद अंजर्लेकर

• **आत्माराम** १५
डॉ.बाळासाहेब दिघे

• **बालशिक्षणतज्ज्ञांची तत्वे आणि आजची बालवाड्यांची कार्यपद्धती** २१
डॉ.कविता साळुंके

• **स्त्री शिक्षण : संघर्षमय दशा व दिशा** २६
डॉ.गीता शिंदे

• **Value Education** ३१
Rajashree Salve

• **सोशल मिडिया आणि संवाद** ३५
प्रा.अदिती आहिरराव, डॉ.किशोर चव्हाण

• **काव्यतरंग** ३८
प्रा. गिरीश पाटील
प्रा. नितीन कोठावदे

• **शब्दतरंग** ४३
• **व्हॉटस्‌अॅप तरंग** ४५
• **शैक्षणिक घडामोडी :** बातम्या / अभिनंदन ४७




३५

Scanned with CamScanner

ISSN 0976-0636 / शिक्षण तरंग

# बालशिक्षणतज्ज्ञांची तत्वे आणि आजची बालवाड्यांची कार्यपद्धती

डॉ.कविता साळुंके
अ.प्राध्यापक,
य.च.म.मु.विद्यापीठ,नाशिक

**प्रास्ताविक :**

बालशिक्षणाचे क्षेत्र हे मानवी क्षमतांना फुलविण्याचे व व्यक्ति विकासाचा पाया घालणारे क्षेत्र आहे. बालकाच्या ज्ञानेंद्रियाचा वापर करण्याची संधी त्यांना प्राप्त करुन देणे हा बालशिक्षणाचा मुख्य आशय. त्याचबरोबर बालकाची भाषिक, बौध्दिक, कारक, भावनिक कौशल्य विकसन आणि त्यांच्यातील सर्जनशीलता व सौंदर्यदृष्टी जागविणे यालाही या शिक्षणात अग्रगण्य स्थान असते. लहान बालकात स्वयं – शिक्षणाची उपजत प्रेरणा असते. त्यामुळे बाल शिक्षणात सहज शिक्षणाचा अंतर्भाव हवा. जेथे सहज शिक्षण व मुलांच्या संवेदनशीलतेला जपणारे वातावरण असते तीच खरी बालशाळा. बालशिक्षणाकडे सर्वांनी गंभीरतेने पहावे त्याचे महत्त्व सर्वांच्या निदर्शनास यावे या हेतूने या संदर्भात रुसो, पेस्टॉलॉजी, फ्रोबेल, मादाम मारिया मॉटेसरी इ. पाश्चात्य तत्त्ववेत्यांनी तर गिजुभाई बधेका, श्रीमती ताराबाई मोडक, अनुताई वाघ या भारतीयांनी केलेले काम अत्यंत मोलाचे मानता येईल. त्यांनी बालशिक्षणाला दिशा दिली असे म्हटले तरी ती अतिशयोक्ती होणार नाही.

भारतात प्रथमतः मिशनरींनी फ्रोबेलच्या विचारावर आधारित बालोद्यान प्रशिक्षण संस्था आणल्या. त्यानंतर १९१५ साली पहिली मॉटेसरी गिजुभाई बधेकांनी सुरु केली. पुढे ताराबाई मोडक – अनुताई वाघ यांनी बालशिक्षणाचे प्रयोग करुन नवनवीन कार्यपध्दती बालशिक्षणात आणल्या.

**बालशिक्षणातील तज्ज्ञांचे योगदान –**

अडीच हजार वर्षांपूर्वी प्लेटो यांनी बालकांना घराबाहेर नेऊन प्रत्यक्ष अनुभवातून शिकवा असे म्हटले. ॲरिस्टॉटल यांनी मुलांच्या चांगल्या सवयींची जोपासना करण्यासाठी त्यांना जाणीवपूर्वक चांगल्या कृती करायला सांगा असे सांगितले. जॉन क्रोमोनिअस यांनी बालशिक्षणाच्या सार्वत्रिकरणाचा विचार मांडतांनाच त्यांना अनुभवातून शिकवा हे तत्त्व दिले तर फ्रेडरिक फ्रोबेल, मादाम मॉटेसरी आणि जीन पियाजे यांनी या शिक्षणावर मोठा ठसाच उमटविला तो काय, तो पुढे लेखात पाहणार आहोत.

**२.१) फ्रोबेल –**

बालशिक्षणात फ्रोबेल यांचा मोठा ठसा आहे त्यांनी १८३५ मध्ये बालशिक्षण वर्ग प्रथमतः सुरु केले त्यात गाणी, गोष्टी, खेळ व लहान उद्योग यांना महत्त्व दिले. त्यामुळे ते बालशिक्षण शाळांना किंडरगार्डन म्हणत.

फ्रोबेल यांचे तत्त्व-मुलामध्ये असलेल्या निर्मितीक्षमतेला वाव देऊन त्याचा विकास करणे. त्यासाठी हेतूतः खेळ घ्यावे. मुलांना कार्यमग्न करावे.

**२.२) डॉ. मारिया मॉटेसरी –**

यांच्याच नावाने पुढे मॉटेसरी उदयास आल्या. त्यांनी दिलेले योगदान म्हणजे –

- अडीच ते सहा वर्षातील बालक अती संवेदनशील असलात म्हणून त्यांना पध्दतशीर शिक्षण द्यावे.
- बालकाच्या बुध्दीचा विकास स्वयस्फूर्तीने आणि विविध कृतीतून बालक स्वतः करतो.



३.५०

Scanned with CamScanner

· बालकाच्या विकासासाठी जाणीवपूर्वक योग्य वातावरण पूरवावे.

· बालकाला स्वयंशिक्षणाची संधी द्यावी त्यासाठी त्याला विविध साधने व स्वातंत्र्य द्यावे.

· बालकावर दडपण न आणता त्याच्या गतीनुसार शिकू द्यावे.

**२.३) जीन पिआजे –**

पिआजे म्हणतात मुलांच्या शारिरीक वाढीच्या अवस्थांप्रमाणेच त्यांच्या बौध्दिक विकासाच्याही अवस्था असतात. अनुवांशिकता व वातावरण याचा बुध्दिविकासावर परिणाम होतो. बालपण बुध्दीविकासात महत्त्वाचे असते.

**बालशिक्षणासाठी तत्त्व –**

· बालकांना कृतींसाठी नैसर्गिक वातावरण द्यावे.

· मुलांना अमुक एक आशय असे न शिकवता कृतीतून तो जे शिकेल ते शिकू द्यावे.

· आवडीच्या कृतींवर व त्या व्यवस्थित करण्यावर भर द्यावा.

· वस्तू हाताळण्यास देऊन त्याचे गुणधर्म सांगावे. त्यातून लहान - मोठा क्रम लावणे मोजणे शिकवावे.

**२.४) गिजूभाई बधेका –**

यांनी मॉंटेसरींचा प्रत्येक सिध्दांत प्रयोगाने निरीक्षणाने पडताळला. त्यांनी बालशिक्षणात केलेले योगदान म्हणजे –

· बालशिक्षणात स्वयंस्फूर्तीला महत्त्व द्यावे.

· पालकांचे वेळोवेळी प्रबोधन करावे.

· बालशिक्षण हे लोकशिक्षणाचे साधन बनवावे.

**२.५) ताराबाई मोडक –**

गिजूभाई बधेकांच्या कार्याने प्रभावित झाल्याने ताराबाईंनी स्वतःची सरकारी नोकरी सोडून गिजूभाईंच्या प्रयोगात सामिल झाल्या बालशिक्षणाला ताराबाई मोडकांचे योगदान म्हणजे.

· घरात शाळेत शांत, प्रसन्न आणि आंतरक्रियात्मक वातावरण ठेवावे.

· बालशिक्षणात स्वातंत्र्य, स्वयंस्फूर्ती, स्वयंशिक्षण आणि व्यक्तिशिक्षण याचा विचार व्हावा.

· काय, केव्हा व किती शिकायचे याची निवड बालकाला करु द्यावी. अभ्यासपत्रक, वेळापत्रक याच्या चौकटीत बालकाला अडकवू नये.

· बालकात आपली संस्कृती रुजवावी.

· बालकाला प्रेमाने समजवावे.

· बालशिक्षणात स्पर्धा नको.

· बालक व शिक्षक यात मित्रत्त्व असावे.

· अध्यापनासाठी जास्तीत जास्त चित्र व गीते वापरावीत.

· मुलांच्या जिज्ञासेला प्रोत्साहन द्यावे.

· मुलांना शिक्षा करु नये अपशब्द वापरु नयेत.

· मुलांनी केलेल्या चुकांची कारणे शोधून त्यावर उपाय योजावेत.

**२.६) अनुताई वाघ –**

ताराबाईची ओळख झाली आणि त्यांचे शिष्यत्त्व पत्करुन अनुताईंनी बालशिक्षणात स्वतःला वाहून घेतले. त्यांनी दिलेली तत्वे पुढीलप्रमाणे –

· बालक जेथे असेल तेथे बालशिक्षण व्यवस्था करावी. उदा. खेडेगाव, डोंगरकपार, बेटे इ.

· बालशिक्षण जेथे दिले जाते. त्या परिसराशी मिळतीजुळती कार्यपध्दती असावी.

· मुलांची स्वच्छता हा बालशिक्षणाचाच भाग समजावा.

· मुलांना खेळणी देतांना किंवा खेळणी खरेदी करतांना त्यांच्या विकासाचे भान ठेवावे.

· परिसरातील स्थानिक व्यक्तिंच्या मदतीने परिसरात मिळणाऱ्या वस्तूंपासून खेळणी तयार करावी.

· परिसरातील पाने, फुले, बिया, घरटी, पिसे, दगड इ. चा साधन म्हणून उपयोग करावा.

· दैनंदिन कार्यावर आधारित गाणी, गोष्टी तयार कराव्यात.

या सर्व तज्ज्ञांच्या कार्याचा व त्यांच्या बालशिक्षणातील योगदानाचा अभ्यास केला चिंतन केले तर बालशिक्षणाची काही प्रमुख तत्त्वे आपणास मिळतात.

**३) बालशिक्षणाची प्रमुख तत्त्वे –**

उपरोक्त सर्व तज्ज्ञांच्या योगदानातून प्राप्त झालेली काही प्रमुख तत्त्वे पुढीलप्रमाणे सांगता येतील–

i) बालशिक्षण बालकेंद्री असावे.

ii) बालशिक्षणात स्वयंशिक्षण या पध्दतीचा जास्तीत

ास्त वापर करावा.

i) बालकाच्या उपजत क्षमतांचा विकास साधण्याच्या ष्टिने/हेतूने बालशिक्षण द्यावे.

v) बालशिक्षण आनंददायी असावे. हसत खेळत, अनुभवातून, स्वतःच्या कृतीतून, निसर्गातून शिक्षण द्यावे.

v) बालशिक्षणात लेखन, वाचन, गणित यांचा भार टाकू नये कारण त्यामुळे मुलांचा नैसर्गिक विकास थांबतो.

vi) बालकांना बक्षिस, शिक्षा व परिक्षा नसावी.

vii) सहकारावर भर असावा, स्पर्धा नसावी.

उपरोक्त तत्त्वातून बालशिक्षण कार्यपध्दती बाबतीत अनेक मार्गदर्शक मार्गदर्शन नियम मिळू शकतात त्या आधारे लिटल व्हन्डर्सच्या बालशिक्षण कार्याचे केलेले एक परिक्षण –

**३) आजचे बालवाडी आणि बालशिक्षणाची तत्त्वे –**

बालशिक्षणाच्या निरीक्षणातून व रोजच्या अभ्यासातून या तत्त्वासंदर्भात केलेली माझी निरीक्षणे मी येथे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थातच तटस्थपणे आजच्या बालवाड्यांची कार्यपध्दती बालकेंद्री आहे यात शंका नाही. कारण येथे सर्वच विषय Activity Based मेथडने शिकविले जातात असा माझा अनुभव आहे. शिवाय येथील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमात काही गोष्टी निवडण्याचे स्वातंत्र्य असते. उदा. डान्स, स्केटींग, म्युझिक इ. मधून एक कोणते गेम खेळायचे हे मुले ठरवतात. याचाच अर्थ त्यांना स्वातंत्र्य देण्यात येते.

· स्वयंशिक्षणाचा वापरही करण्यात येतो असे अनुभवले. ब-याचदा मुलांना प्रोजेक्ट करण्यास दिले जातात. प्रत्यक्ष त्या संबंधित क्षेत्रावर नेऊन त्याचे ज्ञान त्यांना अनुभवायला दिले जाते. उदा. हॉटेलमधील मॅनर्स प्रत्यक्ष भेटीतून शिक्षण, निसर्गातील लिव्हींग – नॉन लिव्हिंग प्रत्यक्ष सहलीतून अध्यापन कापडाचे प्रकार प्रत्यक्ष स्पर्शातून परिणामतः मुले जे शिकतात ते तात्पुरते न राहता कायमस्वरुपी ज्ञान मिळवतात.

· प्रत्येक विद्यार्थ्यांच्या क्षमतांचे नोटींग त्यानुसार त्यांच्या क्षमतांना विकासाची संधीही देण्यात येते. उदा. विविध विषय स्पीच, वर्गात घेतले जाणारे संवाद, प्रोजेक्ट स्पष्टीकरण यातून विद्यार्थ्यांची भाषा क्षमता विकास, मुलांना डान्स, नाट्य, गायन, स्केटींग इ. उपक्रमातून त्यांच्या सुप्त क्षमतांना देण्यात येणारी संधी. या गोष्टी आजच्या बालवाड्यात एक वेगळी कार्यपध्दती निदर्शनास आणते.

· मुले कधीही मी आज शाळेत जात नाही असे म्हणत नाहीत. सकाळची शाळा, थंडीच्या दिवसात असलेली थंडी, पावसाळ्यातील पाऊस पण कधीही शाळेत जाण्याचा उत्साह यत्कींचीतही कमी होत नाही. याचाच अर्थ तेथे आनंददायी वातावरण आहे. एकूणच शाळेची रचना, तेथील खेळणी, विद्यार्थ्यांना दिल्या जाणा-या कृती, उपक्रम, शिक्षकांची प्रेमळ वागणूक, रोज नविन गोष्टीचा ध्यास, कळत नकळत स्वयं अनुभूतीतून दिले जाणारे शिक्षण ही

सर्व आनंददायी शिक्षणाचीच वैशिष्ट्ये होत.

· अडीच ते सहा वर्षे बालकांच्या शारीरिक, बौध्दिक, भावनिक व सामाजिक क्षमतांचा विकास होतो या काळात त्यांना लेखन – वाचन व गणित शिकवू नये त्यामुळे नैसर्गिक विकास थांबतो या तत्त्वाला मात्र काहीसा तडा आढळतो. पण ती काळाची आणि स्पर्धेच्या युगाची गरज आहे. त्यामुळे ते विषय समाविष्ट असावेत परंतु ते शिकवितांना जास्तीत जास्त कृती व चित्रांचा वापर यामुळे मुले ते ही आनंदाने शिकतात असे जाणवले.

· बक्षिसे, शिक्षा व परीक्षा यांना बालशिक्षणात स्थान नसावे असे बालशिक्षणाचे तत्त्व सांगते परंतु ते ही थोड्याफार प्रमाणात देताना दिसते. पण बक्षिसे देतांना मुलांमध्ये स्पर्धा किंवा न्यूनगंड निर्माण होणार नाही याची काळजी घेतलेली दिसते. प्रत्येकाला बक्षिस मिळेल अशी व्यवस्था. परिक्षा तर मुलांना परिक्षा वाटतच नाही टेन्शन नाही, अभ्यासाचे बर्डन नाही रोजच्यापेक्षा जास्त स्वतंत्रतेची जाणिव त्यामुळे हसत खेळत परिक्षा होतात. मुलांना परिक्षा म्हणजे खूप काहितरी आणि आता आपले मूल्यांकन होणार याचा गंधही झालेला दिसत नाही त्यामुळे परीक्षाही इष्ट वाटतात. शिक्षा मुलांना होतात पण त्या त्यांच्या लेव्हलच्या असतात केवळ मुलांना आपण चुकलो याची जाणीव करुन देणा-या त्यामुळे मुलांना शाळेचे असणारे



Scanned with CamScanner

ॲटरॅक्शन कमी होत नाही. बालशिक्षीकाही मुलांना समजून घेतात. त्यांचे बोलणे, रडणे, रुसणे, उत्साहातील कार्य, कंटाळा समजतात. परिणामतः बालमानस तज्ज्ञांनी दिलेली तत्त्वे त्यांच्या कार्यात परावर्तित होतांना दिसतात. शाळेने एका क्लासमध्ये किमान विद्यार्थ्यांना दिलेला प्रवेश, त्यांची विशिष्ट बैठक व्यवस्था, १५ ते २० विद्यार्थ्यांमागे दोन शिक्षक व एक सेविका ,त्यांचा ब्रेकफास्ट व जेवण त्यातील गुणवत्ता इ. संदर्भात शाळांनी घेतलेले धोरणात्मक नियमही शाळेमध्ये बालशिक्षण तत्त्व दिसण्याची कारणे म्हणता येऊ शकेल.

**४) सारांश –**

पूर्णप्राथमिक व प्राथमिक शाळा म्हणजे मुलांचा पहिला शिक्षणाचा टप्पा. त्यामुळे तेथे शिकवणा-या शिक्षकांची भूमिका आईप्रमाणे असावी. मुलांना सामुदायिक माता मिळाल्याचा आनंद द्यावा. शब्दांच्या पलिकडचे एक भावनिक नाते निर्माण व्हावे आणि या मातेच्या (शिक्षिकेच्या) प्रेमातून / उबेमुळे मुलांचा शारीरीक व मानसिक विकास व्हावा अशी कल्पना उपरोक्त चर्चिलेल्या या सर्व बालशिक्षणाबाबतीत तत्त्वे मांडणा-या तज्ज्ञांमध्ये दिसते. प्रत्येक शाळा, बालकमंदिरे यात ती परावर्तीत व्हावी अशी अपेक्षा.

**५) संदर्भ –**

- बालमानसशास्त्र - शरयू बळ आणि भा. के. सोहनी.
- बालमनाचा मागोवा - शांता ब्रम्हे व शांता आठवले.
- शिक्षणक्षेत्रातील विचारवंत – ना. ग. पवार.
- पाश्चात्य शिक्षणाचा इतिहास – देशपांडे, माळी.
- पानसे अरुंधती – कोसबाडच्या टेकडीवर.
- गिजुभाईंचे हितगुज – ग्राम बालशिक्षण केंद्र.



**Shikshan Tarang**

MEMBERSHIP FORM

*Date :* ______

*Name :* ______

*Designation :* ______

*Institution :* ______

*Address :* ______

*Phone No. :* ______

*Fax No. :* ______

*e-mail :* ______

*Cheque/D.D./M.O. No.* ______

*dated* ______

*Amount* ______

*Drawn on* ______

*Signature*

*Institution's Seal*

***Address For Sending Subscription***

*Editor, Shikshan Tarang,*
*C/o.Shreerang Mangal Apartment,*
*Shrirang Nagar, Vidya Vikas Circle,*
*Gangapur Road, Nashik.*
*0253-2574344*



Scanned with CamScanner

रेशशी बोलण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्याचा फोन चऑफ लागत होता. मनातून सुनिता फार लज्जित झाली



होती. ही गोष्ट ती आपल्या पालकांना सांगू शकत नव्हती. वटी ती डिप्रेशनची शिकार झाली.

सुनितासारख्या अनेक मुली मोबाईलवर चॅटिंग दरम्यान बॉयफ्रेंड बनवितात. आणि त्यांना धोका दिला जातो. त्यामुळे मुलींनी मोबाईलचा वापर करावा परंतु चॅटिंग करताना खूप सावधगिरी बाळगली पाहिजे.

**वाढते रस्ते अपघात :**

जेव्हापासून मोबाईलचा वापर वाढला तेव्हापासून अपघातही जास्त होऊ लागले आहेत. आज बाईकस्वार, सायकलस्वार, स्कूटरस्वार, कारचालक व रिक्षाचालकही मोबाईल कानाला लावलेले दिसतात. ते नेहमी कानामध्ये लीड बसवून बेफिकीर होऊन सडक किंवा रेल्वे लाईन ओलांडतात. त्याची शिक्षा त्यांना प्राण गमावून भोगावी लागते. ते एवढ्या मोठ्या आवाजात संगीत ऐकतात की, त्यांना आसपासचे मुळीच भान राहत नाहीत. त्यांना कोणत्याही गाडीचा हॉर्नही ऐकू येत नाही.

वाहन चालविताना मोबाईलचा वापर केल्यावर लक्ष विचलीत होते आणि अपघात होण्याची दाट शक्यता असते. अर्थात सरकारने वाहन चालविताना मोबाईलवर बोलणे किंवा लीड लावून गाणे ऐकणे हे बेकायदेशीर असल्याचे जाहीर केले आहे. परंतु तरीसुद्धा लोक बेधडक रस्त्यावर मोबाईलचा वापर करतात.

दिल्लीत राहणाऱ्या कांचनच्या पतीला कंपनीकडून गाडी मिळाली होती. एके दिवशी कांचन गाडी घेऊन शॉपिंगला निघाली. वाटेत तिच्या मैत्रिणीचा फोन आला आणि ती तिच्याशी गप्पा मारु लागली. तेवढ्यात लाल सिग्नल लागला आणि मोबाईलवर गप्पा मारणाऱ्या कांचनने लाल दिवा न पाहता गाडी चालू ठेवली. त्यामुळे दुसरीकडून येणाऱ्या गाडीशी टक्कर झाली. अर्थात कोणी जखमी झाले नाही आणि एक मोठा अपघात होता होता टळला.

**मोबाईलने सेल्फी जीवघेणा :**

मोबाईल फोनमुळे नात्यामधले अंतर वाढत चालले आहे. पूर्वी लोक एकमेकांच्या घरी जात होते, गप्पा मारीत होते आणि एक कौटुंबिक नाते टिकविले जात होते. परंतु मोबाईलमुळे आता नात्यांमध्ये एक प्रकारचा दुरावा आला आहे.लोक दिवसभर मोबाईलवर व्यस्त असतात. आजकाल कोणाकडेही कोणासाठी वेळ नाही. मोबाईल एक उपयुक्त वस्तू आहे हे जरी खरे असले तरी जे लोक त्याला आपल्या मनोरंजनाचे साधन बनवितात ते लोक अडचणीत सापडतात आणि एक दिवस असा येतो की, ते एकटे राहतात आणि मग एकटेपणामुळे डिप्रेशनमध्ये जातात.

मनुष्य मोबाईलच्या एवढ्या आहारी जातो की, तो आपल्या जीवनसाथीलाही विसरुन जातो आणि मग सुरु होतात भांडणे, धुसफूस, गाजियाबादमध्ये राहणारे अमर श्रीवास्तव संपूर्ण दिवस ऑफिसात असतात तर त्यांची पत्नी सोमा घरी एकटीच असते. ते जेव्हा रात्री उशीरा घरी येतात तेव्हा त्यांच्याकडे पत्नीसाठी वेळ नसतो आणि जेवढा वेळ घरी असतात ते फक्त मोबाईलवर गेम खेळतात किंवा व्हॉटसअॅपवर असतात. या एकटेपणामुळे कंटाळून त्यांची पत्नी सतत आजारी पडू लागली.

मोबाईल जेवढा गरजेचा आहे त्याचे परिणाम जास्त हानीकारक आहेत. त्यामुळे मोबाईलचा वापर विचारपूर्वक करावा.

□□□





Scanned with CamScanner